**SAI TUTORIALS**

**Std.: 10 (English)** **Marathi** **Marks: 80**

**Date: 13-12-23** **PRELIM-1 SET C** **Time: 3 hrs**

**Chapter: All**

**विभाग १ - गदय**

**प्र.१ (अ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1 **A1)** i) कारणे लिहा 1

स्नेहलने पावडेकाकांना पाणी दिले, कारण ...

ii) रिकामी जागा भरा. 1

समदी धूळ लागती ...............

"अवो, स्नेहाताई, मी कुठं एसीत बसूनशान काम करत्ये बाई. शेनामातीत काम करावं लागतं! आन आमच्या वस्तीचा रस्ता बी समदा उखणलाय. समदी धूळ लागती पायास्नी. आन धा-धा मिन्टाला हातपाय धोयाला येळ बी नाय आन पानी तरी कुठं हाय बक्कळ?"


"सॉरी, मावशी खरंच सॉरी", आपण त्यांच्या मळकट पायांबद्दल बोललो याचं स्नेहललाही कसंतरी वाटलं. तिला टाचेला फाटलेली, अगदी पातळ झालेली त्यांची चप्पल आठवली. रेखामावशीच्या खणखणीत आवाजानं सुमितही जागा झाला आणि हॉलमध्ये आला. सगळा प्रकार त्याच्या लक्षात आला. तेवढ्यात पावडेकाकाही आले. आज बाबा आणि पावडेकाका कुठल्याशा कार्यक्रमाला जाणार होते. स्नेहलने पावडेकाकांना पाणी दिलं. फरशी पुसणाऱ्या रेखामावशींचं लक्ष पावडेकाकांच्या तळव्याकडं गेलं. एकदम गोजिरा, गुलाबी तळवा. कुठं चिरण्या नाहीत की काही नाही! 'एकदम लोन्यागत पाय हाय काकांचा', रेखामावशी स्वत:शीच पुटपुटल्या. त्यांनी स्वत:च्या पायाकडं पाह्यलं... पायाला किती तरी चिरण्या पडल्या होत्या .. माती धूळ बसून त्या काळ्या पडल्या होत्या . अभिषेक-स्नेहलचे बाबाही तयार होऊन हॉलमध्ये आले.

"मामा, मी एक ॲप तयार केलं आहे. त्या ॲपच्या साह्यानं आपण कोणाचे पाय किती स्वच्छ आहेत, हे सांगू शकतो", सुमितनं सांगितलं.

"सुमित, अरे, पाय स्वच्छ आहेत की नाही, हे सांगायला ॲपची काय गरज आहे? तुम्हां टेक्नोसॅव्ही लोकांना कशाचंही ॲप करण्याशिवाय काही सुचतं की नाही? अरे, सगळ्यात भारी ॲप डोक्याच्या कवटीत आहे, हे विसरलात की काय तुम्ही लोक?" बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दलची आपली मळमळ व्यक्त केली.

"मामा, गंमत तर बघ तू माझ्या ॲपची...त्याचं नाव आहे फूटप्रिन्टस", असं म्हणत सुमितनं आपला स्मार्टफोन काढला.

**A2)** आकृती पूर्ण करा. 2




**A3)** स्वमत 3

तुमच्या घरी येणा-या कामवाल्या मावशींचा अनुभव थोडक्यात सांगा.

**(आ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1 **A1)** चौकटी पूर्ण करा 2

(i) वाघिणीच्या पिल्लांचे वय - ...............


(ii) वाघिणीला अवगत असलेली कला - ...............

साधारणत: कुत्र्यापेक्षा लहान आकाराची ही पाच महिन्यांची पिल्लं होती. या वयात लहान मुलं जशी खेळकर असतात, तशीच ही खेळकर होती. एकमेकांचा पाठलाग करणं, मारामारी करणं, पाण्यात उड्या घेणं असे खेळ सुरू झाले. मध्येच आई वळून एखाद्या पिल्लाला मायेने चाटत होती.

थोडा वेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली. डोकं वळवून तिनं हळूच 'ऑऽ वऽ' असा आवाज केला. हा पिल्लांना मागं येण्याबद्दलचा इशारा होता. लगेच वळून ती चालायला लागली. हिनं जंगलात कुठंतरी नक्कीच एखादं सांबर, रानगवा, नीलगाय, रानडुकराची शिकार साधली असावी; पण अशी शिकार जड असल्यानं ती उचलून पिल्लापर्यंत आणणं शक्य नसतं. त्यामुळं पिल्लांजवळ येऊन घटकाभर पाण्यात बसून तिनं विश्रांती घेतली होती आणि आता ती पिल्लांना त्या शिकारीकडं घेऊन जात होती. या चार पिल्लांसोबतच स्वत:चं पोट भरण्यासाठी तिला सतत कोणती-कोणती शिकार करणं आवश्यकच होतं. त्या कलेत ही चांगली पारंगत होती.

वाघिणीनं नाला पार करून बांबूच्या गंजीत पाय ठेवला. आत शिरण्याआधी तिनं वळून पिल्लं सोबत येताहेत की नाही हे पाहून घेतलं.

**A2)** चौकटी पूर्ण करा 2





**A3)** स्वमत 3

'लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली', हे विधान पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

**अपठित गदय**

**(इ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1 A1)** आकृती पूर्ण करा. 2




कोट्यवधी वर्षांपूर्वी पृथ्वी सूर्यापासून अलग झाली. ती हळूहळू थंड होत गेली. तिच्यावर जी माती निर्माण झाली तीतूनच पुढे जीव जन्माला आले. सुरुवातील ह्या जगात जन्माला आलेला जीव म्हणजे वनस्पतीच तर होता. त्यातून हळूहळू उत्क्रांती होत मानवाची निर्मिती झाली. जगात निर्माण झालेली ती पहिली वनस्पती हे जर एक टोक मानल तर मनुष्य हे त्या साखळींच दुसरं टोक आहे असं म्हणता येईल. माणूस हा झाडासारखा आहे. ऊन, सावली, थंडी, उष्णता ह्या सगळ्यांचा जसा झाडांवर परिणाम होतो, तसाच तो माणसांवरही होतो. आसपासच्या वातावरणामुळे माणसाचा स्वभाव बदलतो. त्याच्या रक्तदाबातही बदल होतो. म्हणूनच मनुष्य हादेखील एक झाडच आहे. त्यामुळेच झाडांशी आपल फार पूर्वीपासून कौटुंबिक नात आहे. पिंपळ हा पुरातन वृक्ष तर आपल्या पूर्वजांसारखा आहे. त्यातील रेणू हे मानवी शरीरातील
रेणूंशी मिळते जुळते आहेत. म्हणून पिंपळाचा उपयोग औषध बनविण्यासाठी केला जातो.

**A2)** अचूक विधान लिहा 2

(i) झाडांशी आपले कौटुंबिक नाते आहे - ................

(ii) पिंपळाचा उपयोग औषध बनविण्याकरिता करतात - ................

**विभाग २ - पदय**

**प्र.२ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1 A1)** i) चौकटी पूर्ण करा 1

(i) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी - ..............

(ii) पिलांना सुरक्षितता देणारे - ..............

ii) कोण ते लिहा. 1

चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी - ..............

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी | पांखोवा जेवीं पिलियांसी |
जीवन जैसे कां जीवांसी | तेवीं सर्वांसी मृदुत्व ||
जळ वरिवरी क्षाळी मळ | योगिया सबाह्य करी निर्मळ |
उदक सुखी करी एक वेळ | योगी सर्वकाळ सुखदाता ||
उदकाचें सुख तें किती | सवेंचि क्षणें तृषितें होती |
योगिया दे स्वानंदतृप्ती | सुखासी विकृती पैं नाही ||
उदकाची जे मधुरता | ते रसनेसीचि तत्त्वतां |
योगियांचे गोडपण पाहतां | होय निवविता सर्वेंद्रियां ||
मेघमुखें अध:पतन | उदकाचें देखोनि जाण |
अध:पातें निवती जन | अन्नदान सकळांसी ||
तैसे योगियासी खालुतें येणें | जे इहलोकीं जन्म पावणें |
जन निववी श्रवणकीर्तनें | निजज्ञानें उद्धरी ||

**A2)** फरक स्पष्ट करा. 2

योगीपुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा.

**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

(i) तृषित - ................
(ii) क्षाळणे - ................

**A4)** स्वमत 2

योगी पुरुष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.

**(आ) कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा. (8)**

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री -
(२) प्रस्तुत कवितेचा विषय -
(३) कवितेतून मिळणारा संदेश -
(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे व न आवडण्याचे कारण -
(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा -
(i) राखण - (ii) रक्त - (iii) औक्षण - (iv) डोळे -

**किंवा**

दोन दिवस कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री (०१ गुण)
२) कवितेचा विषय (०१ गुण)
३) खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा. (०२ गुण)
शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले रात्र छुंद झाली,
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
४) कविता आवडण्याची व न आवडण्याची कारणे (०२ गुण)
५) कवितेतून मिळणारा संदेश (०२ गुण)

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र.३ खालील कोणत्याही दोन कृती सोडवा. (6)**

**1)** टीपा लिहा: व्युत्पत्ती कोशाचे कार्य?

**2)** ' पाणी हेच जीवन !' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

**3)** 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते', हे विधान स्वानुभवातून स्पष्ट करा.

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**(१) वाक्यांचे प्रकार ओळखा - (2)**

i. मुलांनो, रांगेत चला.
ii. एकीकडे एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि दुसरीकडे विज्ञान समजलेला.

**(२) वाक्यरुपांतर -** **(2)**

**1)** ही कल्पना वाईट नाही. (होकारार्थी वाक्य करा.)

**2)** तो दररोज व्यायाम करतो. (प्रश्नार्थी करा)

**(३) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (फक्त २)** **(4)**

**1)** सक्त ताकीद देणे -

**2)** अदृश्य होणे →

**3)** थक्क होणे →

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती -**

**(i) लिंग बदला.** **(1)**

शिक्षक - ...............
कवी - ...............

**(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

**1)**
i. सोपे × ..............

ii. दिवस × ...............

**(iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(1)**

**1)** i. किर्तन सांगणारा → ...............
ii. मूर्ती जेथे असते ती देवालयातील जागा → ...............

**(iv) वचन बदला.** **(1)**

(i) परीक्षा (ii) नदी

**(२) लेखननियमांनुसार लेखन -**

**लेखननियमांनुसार बदल करा.** **(2)**

**1)** आई हीच प्रत्येक मूलाची पहिली शीक्षक असते.

**2)** पुन्हा नीळा तूकडा चमकला.

**(३) विरामचिन्हे -** **(2)**

**1)** खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा.
ते म्हणाले, "तुम्ही त्याची काळजी का करता?"

**2)** खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखून लिहा.
घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस, अधीक्षक सारे अधिकारी तत्काळ त्या ठिकाणी जमा झाले.

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र.५ (अ) 1. पत्रलेखन -** **(6)**

**खालील विषयावर पत्र लिहा.**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

**त्वरा करा ! त्वरा करा !**
**सुवर्णसंधी**

प्रकाश स्टेशनरी मार्ट तर्फे
स्वस्त दरात शालोपयोगी साहित्य

**स्थळ**

प्रकाश स्टेशनरी मार्ट,
एस. व्ही रोड, दादर (प.)

**व्यवस्थापक**

प्राजक्ता / प्रवीण जोशी, योगीनंद सोसायटी, दादर (प.)

नागरिक या नात्याने

| | | |
|---|---|---|
| शालोपयोगी साहित्य मागविण्यासाठी पत्र लिहा | **किंवा** | मागविलेल्या साहित्यात त्रूटी आढळल्याने हे बदलून देण्याची विंनती करणारे पत्र लिहा. |

**किंवा**

2. **सारांशलेखन -**

**विभाग १ - गदय प्रं.१(इ) उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृति करा.** **(10)**

**(१) जाहिरातलेखन (60 ते 80 शब्द)**

दिलेल्या शब्दांवरून जाहिरात लेखन करा.
'संगणक वर्ग' याची जाहिरात करा.

**(२) कथालेखन (80 ते 100 शब्द)**

'मैत्रीचे अतूट नाते' या शीर्षकावरून कथा लिहा.

**(३) बातमीलेखन (80 ते 100 शब्द)**

'लातूर येथे झालेला भूकंप'

**(इ) लेखनकौशल्य** **(8)**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा 100 ते 120 शब्द)**

1)

**शाळेचा निरोप समारंभ**

संध्याकाळी ५.००वाजता

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी


*स्थळ: शाळेचे सभागृह*

**प्रमुख पाहुण्या – माजी विद्यार्थिनी मा. डॉ. सुलोचना राणे**

विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम

खास आकर्षक सभागृहाची सजावट

**2)** चौकटीत दिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा.




**3)** साक्षरता - एक अभियान

**मुद्दे:** भारतात साक्षरतेची गरज - ग्रामीण भागातील अज्ञान - लिहिता वाचता आल्याचे फायदे - देशाचा विकास - साक्षर देश म्हणून जगात नावलौकिक.